# <u>मराठी विभाग</u>

सन २०११ ते २०१२ या शैक्षणिक वर्षात मराठी विभागाच्यावतीने विविध दर्जेदार अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. २६ जुलै २०११ रोजी ख्यातनाम समाजसेविका **सिंधुताई सपकाळ** यांच्या हस्ते मराठी वाड्.मय मंडळाचे उद्घाटन झाले. या निमित्ताने सिंधुताईंनी केलेल्या भाषणात अतिशय भेदक, भावस्पर्शी, उद्बोधक आणि दिशादर्शक विचार मांडले. सिंधुताईंच्या जीवनातील अनुभवाची दाहकता अनुभवतांना काहींच्या पापण्या पावसाळल्या तर काहींच्या अंगावर काटा उभा राहिला. या कार्यक्रमाचे वैशिष्टय म्हणजे पेशवे सभागृह तर खच्चून भरलेले होतेच पण कात्यायन आणि पाणिनी ही सभागृहेही तुडूंब भरलेली होती. कार्यक्रम पडदयावर बघण्याची व्यवस्था तेथे करण्यात आली होती. या सुंदर आणि अविस्मरणीय कार्यक्रमाच्या **अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह** हया होत्या. प्रारंभी प्रा. दामोदर मोरे यांनी सिंधुताईचा अतिशय नेमक्या आणि नेटक्या शब्दात काव्यात्म आणि मार्मिक परिचय करून दिला. प्रा. अनिल भाबड आणि प्रा. संतोष राणे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खूप मेहनत घेतली.

मराठी विभागाच्या वतीने २४ ऑगस्ट, २०११ रोजी प्रसिध्द साहित्यिक आणि ग्रंथालीचे लेखक **प्रा. भगवान इंगळे** यांच्या आत्मकथनाचा कार्यक्रम कात्यायन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी **मा. प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह** हया होत्या. या प्रसंगी प्रा. भगवान इंगळे यांनी अतिशय दाहक आणि वेदनादायी अनुभवाचे कथन विद्यार्थ्यांसमोर केले. अडीअडचणीवर मात करून माणूस कसा मोठा होऊ शकतो. त्याचा आदर्शच त्यांनी विद्यार्थ्यांपुढे ठेवला. या कार्यक्रमास प्रा. अनिल भाबड प्रा. संतोष राणे आणि इतरही विषयाचे विभागप्रमुख आणि प्राध्यापक उपस्थित होते.

मराठी विभागाच्या वतीने २० सप्टेंबर २०११ रोजी एअरइंडियाच्या पायलट कॅप्टन **नीलम इंगळे–लोगो** यांना पाचारण करण्यात आले होते. मराठी विभाग प्रमुख **प्रा. दामोदर मोरे** यांनी या प्रसंगी त्यांची २ तास अत्यंत रंजक, उद्बोधक आणि बहारदार मुलाखत घेतली. प्राचार्या डॉ.शकुंतला सिंह यांनीही काही मार्मिक प्रश्न विचारून कार्यक्रमात रंगत आणली. स्वत: अत्यंत बुध्दिमान, सुंदर आणि अभिनय कुशल असलेल्या कॅप्टन नीलम यांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांची अतिशय समर्पक उत्तरे दिली. जीवनात उज्वल ध्येय ठेवा आणि ते प्रयत्नपूर्वक साध्य करण्याचा संदेश त्यांनी दिला. गाढवाचं लग्न' मधील काही प्रसंगांचा त्यांनी केलेला अभिनय विद्यार्थ्यांना खूपच भावला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी **प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह** हया होत्या. प्रा. अनिल भाबड आणि प्रा. संतोष राणे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

दिनांक १५ डिसेंबर २०११ रोजी मराठी विभागाच्या वतीने वृक्षदिन साजरा करण्यात आला. मराठी विभागाचे आणि इतरही विद्यार्थी या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी

झाले होते. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रा. दामोदर मोरे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

दि. २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा दिन जोशी बेडेकर महाविद्यालया तर्फे साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मा. प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह हया होत्या. यावेळी प्रा. दामोदर मोरे यांचे कुसुमाग्रजांच्या जीवनावर व्याख्यान झाले.

कु. पूजा मोहिते, दर्शना भांडालकर, संतोष गिरी, मोनाली जोशी यांनी काढलेल्या चित्रप्रदर्शनाचे उद्‌घाटन मा.प्राचार्यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. संध्या शहापुरे निर्मित कुसुमाग्रजांवरील लघुपट दाखवण्यात आला.

तृतीया वर्ष कला मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपत्रिका क्र. ५, ८,९ यावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. डोंगरदिवे, प्रा. स्नेहा देऊस्कर आणि प्रा. डॉ. अरूण देवरे यांनी अभ्यासपूर्ण व्याख्याने दिली.

<u>प्रा. दामोदर मोरे</u>

०१. गुरू नानक कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मुंबई यांनी आयोजित केलेल्या **'मानवी हक्क'** या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात **'मानवाधिकार—शिक्षा, जागृति एवम् अनुबोध'** या विषयावर शोधनिबंध वाचन — ९ डिसें., २०११

०२. लाला लजपतराय महाविद्यालय, मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात **'लिंगभेद एवम् मानवाधिकार का हन्‌न'** या विषयावर शोधनिबंध सादर — २३ डिसेंबर, २०११

०३. परभणी येथील शिवाजी महाविद्यालयात **'वर्तमान हिंदी साहित्य: परिदृश्य, विमर्श एवं आन्दोलन'** या विषयावर झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात **'वर्तमान हिंदी साहित्य की पृष्ठभूमि में डॉ. बाबासाहेब आम्बेडकर की समतामूलक विचारधारा'** या विषयावर शोधनिबंध वाचन २९, ३० डिसेंबर २०११

०४. **'दामोदर मोरे की हिंदी कविता में आम्बेडकरवादी चेतना'** या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात **प्रा. वाळवंटे हे पी.एच.डी.** करीत आहेत. डिसेंबर २०११

०५. मुंबई विद्यापीठातर्फे बिर्ला महाविद्यालयात आयोजित निवड श्रेणीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून प्रा. दामोदर मोरे उपस्थित राहिले. २३ जानेवारी, २०१२

०६. श्री. जगदिश प्रसाद साबरमल, विद्यापीठाने मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या **'कन्टेम्पररी लिटररी इंडियन क्रिटीसीझम'** या विषयावरील राष्ट्रीय चर्चा सत्रात एका सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले १ आणि २ फेब्रु., २०१२

०७. मुंबई विद्यापीठ आणि गोगटे महाविद्यालय बांदा जि. सिंधुदूर्ग यांनी आयोजित केलेल्या **'कुसुमाग्रज यांचे साहित्य: एक चिकित्सा'** या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे **उद्‌घाटन प्रा. दामोदर मोरे** यांच्या हस्ते झाले. ८ फेब्रु., २०१२

०८. **'बहुआयामी कवि दामोदर मोरे'** या विषयावर अखिल भारतीय लेखक संघाने भरविलेल्या संमेलनात (नांदेड) डॉ. सुनिल जाधव यांचे शोधनिबंध वाचन. या शोध निबंधाबद्दल जाधव यांना भाषा रत्न पुरस्कार – फेब्रु. २०१२

०९. **'नब्बे के बाद की हिंदी कविता'** या विषयावर मुंबईच्या सोमय्या महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. अनिल ढवळे यांनी **'दामोदर मोरे की हिंदी कविता में आंबेडकरवादी चेतना'** या विषयावर शोध निबंध वाचला – फेब्रुवारी – २०१२

१०. देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी आयोजित केलेल्या **'इक्कीसवी सदी का हिंदी साहित्य'** या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात **'वर्तमान हिंदी कविता में अम्बेडकरवादी सौन्दर्य चेतना'** या विषयावर शोधनिबंध सादर–शोधनिबंधाच्या ग्रंथात शोध निबंध प्रकाशित – १८ फेब्रु. २०१२

११. **'मराठी की प्रतिनिधि दलित कविता'** –संपादक निशिकान्त उकार – चंद्रकांत पाटील – साहित्य भण्डार प्रकाशन, इलाहाबाद या पुस्तकात दामोदर मोरे यांच्या तीन मराठी कवितांचा हिंदी अनुवाद – मार्च २०१२

१२. **'विश्वभाषाओं से हिंदी मे अनुदित साहित्यकृती दशा और दिशा'** या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात (धुळे) 'ऐलान' या लोकनाथ यशवंत यांच्या अनुवादीत पुस्तकावर शोधनिबंध वाचन २१, २२ मार्च २०१२

१३. नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात **'नागार्जुन एवम् दामोदर मोरे की हिंदी कविता का तुलनात्मक अध्ययन'** या विषयावर डॉ. सुनील जाधव यांच्याकडून शोधनिबंध वाचन. मार्च २०१२

प्रा. दामोदर मोरे
विभाग प्रमुख